Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Kolhapur - 416004
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.**

Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

क्र.कोविमं/माध्य./उ.मा./परीक्षा/ 1513
दिनांक :- 31/08/2023

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/ सांगली/ कोल्हापूर.

**विषय:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा जुलै-ऑगस्ट 2023 करीता प्रविष्ठ विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका वितरणाबाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आपल्या शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा जुलै-ऑगस्ट 2023 करीता प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिका संबंधित वितरण केंद्रावर **मंगळवार दि.05/09/2023 रोजी सकाळी 11.00 वाजता** हस्तपोहोच वाटप करण्यात येणार आहे. तरी सदर दिवशी आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या अधिकृत प्रतिनिधीस पत्रासह वितरण केंद्रावर पाठविण्याची व्यवस्था करावी.

सदर सर्व गुणपत्रिका आपल्याच शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आहेत याची खात्री करावी. अन्य शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका प्राप्त झाल्या असतील तर त्या सिलबंद करुन आपल्या प्रतिनिधीमार्फत त्वरित या कार्यालयाकडे जमा करण्यात याव्यात. तसेच आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विद्यार्थ्याची गुणपत्रिका प्राप्त न झालेस त्वरीत मंडळ कार्यालयास लेखी कळविण्यात यावे. तदूनंतर काही त्रुटी राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाची राहील याची नोंद घ्यावी.

तसेच माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) परीक्षा जुलै-ऑगस्ट 2023 करीता प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांच्या मूळ गुणपत्रिकांचे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात **मंगळवार दि.05/09/2023 रोजी दुपारी 3.00** नंतर वाटप करण्यात यावे.

**(दत्तात्रय शंकर पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**